पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७७ ■ शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




## वातावरणात बदल होण्याची शक्यता!

प्रतिनिधी ३ जानेवारी

**नागपूर :** महाराष्ट्रात येत्या ४८ तासांत हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता असून तापमानात चढ-उतार जाणवतील, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. राज्याच्या काही भागात ढगाळ वातावरण कायम राहणार असून उत्तर भारतात झालेल्या तापमनातील घटीचा परिणाम महाराष्ट्रावरही होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.ष्परिणामी, गारठ्याची तीव्रता काही भागांत अधिक जाणवू शकते.

मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात किमान तापमान दहा ते बारा अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याचा अंदाज आहे. मात्र, निफाड, परभणीसारख्या भागांत रात्रीच्या तापमानात यापेक्षा अधिक घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. थंडीचा प्रभाव वाढल्यास शेती आणि दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होण्याची चिन्हे आहेत. मुंबई शहर आणि उपनगरांत तापमानात काहीसा चढ-उतार राहणार आहे. येत्या २४ तासांत सकाळी आणि दुपारी सूर्यप्रखरतेमुळे उष्णतेचा तडाखा जाणवेल, मात्र दुपारनंतर तापमानात किंचित घट होण्याची शक्यता आहे. कोकण पट्ट्यातही अशीच परिस्थिती राहणार असून पहाटे व रात्री थंडीचा प्रभाव वाढेल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, राज्यात एकूणच सौम्य तापमानवाढ दिसून येत असली, तरी उत्तर महाराष्ट्रात पारा एक ते दोन अंशांनी घसरण्याची शक्यता आहे.

# निवडणुकीचे चित्र स्पष्ट !

## रणधुमाळीला सुरूवात ; 469 उमेदवार रिंगणात, 164 उमेदवारांनी घेतली माघार

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा दिवस होता. काल संध्याकाळपर्यंत ६३३ उमेदवारांपैकी १६४ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेतल्यामुळे आता रिंगणात केवळ ४६९ उमेदवार राहिले आहेत. त्यामुळे निवडणुकीतील चित्र स्पष्ट झाल्यामुळे विविध पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांसह उमेदवारही जोमाने कामाला लागले आहेत. आता खऱ्या अर्थाने रणधुमाळीला सुरूवात होऊन पक्षातील नेत्यांच्या सभा, रॅली, बैठकांना सुरूवात होऊन संपूर्ण वातावरण ढवळून निघाणार आहे.

अकोला महानगरपालिकेच्या सहा झोनमधून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या अनेकांनी माघार घेतल्याने आता मैदानात केवळ ४६९ उमेदवार राहिले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या रणनीतीतही बदल होणार आहे. अनेक दिग्गजांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला असून, यात दोन माजी महापौरसह अनेक माजी नगरसेवकांचाही समावेश आहे. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बंडखोरी, पक्षांतर्गत समन्वय आणि आघाड्या-युतीच्या राजकारणामुळे अनेकांनी माघार घेतली असली तरी त्यांची या निवडणुकीत महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. त्यांच्या पक्षासह इतर पक्षांचेही लक्ष राहणार आहेत. हे ऐनवेळी काय करतील यांचा नेम नसल्याने सर्वच पक्षांचे उमेदवार व नेते सावध भूमिका घेत असून, माघार घेतलेल्यांना समोर करून प्रचाराचा धुराळा उडविण्यात येत आहे. माघार घेतलेल्या उमेदवारांची सर्वाधिक संख्या झोन चार आणि पाचमध्ये आहे. या माघारीमुळे आता थेट लढती होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. काही प्रभागांमध्ये दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी व चौरंगी लढती होणार आहे. प्रमुख राजकीय पक्षांनी बंडखोरांना रोखण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले असून त्याचा परिणाम माघारी घेतल्यावरून दिसून येत आहे. त्यामुळे आता प्रचाराचा वेग वाढला असून, आगामी दिवसात कडाक्याच्या थंडीतही राजकीय वातावरण तापण्याची शक्यता बळावली आहे.

### अनेक दिग्गजांनी सोडले मैदान

महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवसी अनेक दिग्गजांनी मैदान सोडल्याचे दिसून आले. यात भाजपाच्या माजी महापौर सुमनताई गावंडे, काँग्रेसचे माजी महापौर सुरेश पाटील, भाजपाचे दोन माजी नगरसेवक गोपी ठाकरे व सविता ठाकरे, भाजपाचे उपमहापौर राजेंद्र गिरी, शिवसेना उबाठाचे माजी नगरसेवक, शिंदे सेनेचे शहरप्रमुख, माजी नगरसेविकेचा पती, एमआयएमच्या महिला उमेदवार यांचा समावेश आहे.

### माघारमध्ये भाजप, काँग्रेस व वंचित आघाडीवर

प्रभाग ११ अ-काँग्रेसचे माजी नगरसेवक शेख इब्राहीम शेख कासम, प्रभाग १२ अ मधून भाजपचे सुगत गवई, १२ क मधून भाजपच्या दीपिका पाडिया, राजेश्वरी अम्मा शर्मा, मधू पांडे, शिंदेसेनेचे जगजितसिंह विर्क, शिंदेसेनेचे शहरप्रमुख रमेश गायकवाड, प्रभाग १८ मधून माजी नगरसेवक रूपाली अडगावकर, एमआयएमच्य नुसरत परवीन आरीफ खान, प्रभाग १४ ब सुनीता मुरूमकार, १४ ड वंचितचे प्रवीण पातोडे, विजय बोचरे, प्रभाग १५ अ मधून भाजपचे माजी नगरसेवक गोपी ठाकरे, १५ ब मधून माजी नगरसेविका सविता ठाकरे, १५ ड मधून किशोर अलिमचंदानी, ६ ड मधून काँग्रेसचे माजी महापौर सुरेश पाटील, ५ ब मधून माजी नगरसेविका नम्रता माहोड, वंचितचे श्रीकांत ढगेकर, प्रभाग ३ मधून शिंदेसेनेचे संगीता शुक्ल.

### आज होणार चिन्ह वाटप

अकोला महानगरपालिका निवडणूक रिंगणातील उमेदवारांना ३ जानेवारीला चिन्हांचे प्रशासनाकडून चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यामुळे कोणत्या उमेदवाराला कोणते चिन्ह मिळते याकडे अपक्ष उमेदवारांचे लक्ष लागले आहे.




## भाजप प्रदेशाध्यक्षांचा अजित पवारांना थेट इशारा

प्रतिनिधी ३ जानेवारी

**पुणे:** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे केलेले आरोप भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या चांगलेच जिव्हारी लागलेत. त्यांनी आज यासंबंधी पत्रकारांशी संवाद साधताना थेट अजित पवारांनाच निर्वाणीचाी इशारा दिला. अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे ते म्हणालेत.

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा सामना रंगला आहे. अजित पवारांनी शुक्रवारी या प्रकरणी पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. भाजपने मागच्या ७ वर्षांत महापालिका अक्षरशः लुटून खाल्ली. या लुटारुंना रोखण्यासाठी आम्ही एकत्र आलोत, असे ते म्हणाले होते. एवढेच नाही तर ज्या लोकांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्या सर्वांसोबत मी आज सरकारमध्ये बसलो असल्याचेही त्यांनी यावेळी पत्रकारांचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या विधानाचा आज भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी समाचार घेतला.ष्रवींद्र चव्हाण म्हणाले, अजित पवारांनी सर्वप्रथम स्वतःच्या पक्षाकडे पाहिले पाहिजे. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात ठेवावे.

## 4 जानेवारीला मुख्यमंत्र्यांची अकोल्यात विजय संकल्प सभा





प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत विजयाचा शंखनाद करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी, ४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता अकोला क्रिकेट क्लब मैदानावर जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. या सभेची तयारी सध्या जोरदार तयारी सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अकोल्यात येत आहेत. ४ जानेवारी रोजी त्यांची ही सभा शहरातील अकोला क्रिकेट क्लब मैदानावर पार पडणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी पक्षाच्या वतीने ३५ वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

या ऐतिहासिक सभेला यशस्वी करण्यासाठी भाजपचे सर्व आमदार, पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी यांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली आहे. एसीसी क्रिकेट क्लब मैदानावर भव्य डोम उभारण्याचे काम सुरू असून, ज्या मार्गावरून मुख्यमंत्री सभास्थळी येतील, त्या मार्गाची स्वच्छता आणि दुभाजकांचे रंगकाम वेगाने केले जात आहे. सभेच्या नियोजनात कोणतीही कसर राहू नये यासाठी समितीच्या सर्व सदस्यांवर विशेष जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधक्ष संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, जयंत मसने यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सभा यशस्वी करण्यासाठी झटत आहेत.

# माजी महापौर सुमनताई गावंडेंनी पक्षश्रेष्ठींच्या आदेशाला दिला मान !



## प्रभाग क्रमांक २० मधून दाखल केलेली उमेदवारी मागे समाजामध्ये मोठी नाराजी, लवकरच घेणार मोठी बैठक

### माजी महापौरांची शिस्तबद्ध भूमिका

आगामी महापालिका निवडणुकीत अकोल्यातील राजकीय चित्र स्पष्ट होत असताना सुमनताई गावंडेंचा हा निर्णय पक्षाला चांगलाच पूरक ठरेल, असा विश्वास पक्षनेतृत्वाने व्यक्त केला आहे. निवडणुकीच्या रणांगणात उमेदवारांची संख्या, प्रभागनिहाय समीकरणे आणि बंडखोरीचे आव्हान असताना, अशा शिस्तबद्ध भूमिकेमुळे पक्षसंघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.

### सुमनताईंनी दाखविली पक्षनिष्ठा

एकंदर पाहता, अकोला महापालिकेच्या राजकारणात सुमनताई गावंडे यांनी दाखविलेली पक्षनिष्ठा हा केवळ एक राजकीय निर्णय नसून ती सुसंस्कृत लोकशाही राजकारणाची ठाम भूमिका असल्याचे बोलले जात आहे.

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा पक्षशिस्त व एकनिष्ठेला प्राधान्य देणारे उदाहरण अकोला शहराच्या प्रथम माजी महापौर सुमनताई गावंडे यांनी घालून दिले आहे. पक्षश्रेष्ठींच्या स्पष्ट सूचनेनुसार त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेत, पक्षाचा मान राखत राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडविले. यामुळे अकोल्याच्या राजकारणात सुसंस्कृत आणि शिस्तवद्ध राजकारणाचा संदेश गेला आहे.

सुमनताई गावंडे यांच्या निर्णयामुळे त्यांच्या समाजात मोठ नाराजी असून, लवकरच बैठक घेऊन पुढील निर्णय समाज घेणार असल्याची माहिती आहे. माजी महापौर सुमनताई गावंडे यांनी प्रभाग क्रमांक २० मधून उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

मात्र, पक्षातील व्यापक राजकीय गणित, संघटनात्मक गरज आणि विजयाची रणनीती लक्षात घेऊन पक्षनेतृत्वाने दिलेल्या सूचनेवर त्यांनी कोणताही आक्षेप न नोंदविता तत्काळ निर्णय घेतला. 'पक्ष मोठा, व्यक्ती लहान' या तत्त्वाला अनुसरून त्यांनी घेतलेला हा निर्णय कार्यकर्त्यासाठी दिशादर्शक ठरला आहे. अकोला महापालिकेच्या निवडणुकीत पक्षांतर्गत समन्वय, शिस्त आणि एकजूट अत्यत महत्त्वाची असताना सुमनताई गावंडे यांची भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे. सत्तेतील पद असूनही त्यांनी वैयक्तिक राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून पक्षहिताला प्राधान्य दिल्याने त्यांची प्रतिमा अधिक मजबूत झाली आहे.

## भीषण अपघातात ट्रॅव्हल्स चालक ठार

प्रतिनिधी ३ जानेवारी

**खामगाव:** समृध्दी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात घाटपूरी येथील जावई असलेल्या ट्रॅव्हल्स चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याअपघातात बसमधील २९ प्रवासी सुखरूप बचावले असून चालकाचा जागीच मृत्यू झाला. मृत चालकाचे नाव अमोल शेलकर ४२ वर्ष असून ते नांदुरा तालुक्यातील वाडी महाळुंगी येथील रहिवासी परंतु सध्या घाटपुरी येथे सासरी वास्तव्यास होते. २ जानेवारी रोजी ही घटना घडली.

प्राप्त माहितीनुसार, एमएच १९ एएक्स ३०१५ साई क्रमांकाची ट्रॅव्हल्स कंपनीची बस अमोल शेलकर हे चालवत होते. समृध्दी महामार्गावरून जात असताना एका ट्रकने अचानक ओव्हरटेक केल्याने बस आणि ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. अपघातानंतर बसमधील सर्व २९ प्रवासी तात्काळ बाहेर पडण्यात यशस्वी झाले. मात्र चालक अमोल शेलकर हे बसमध्ये अडकून पडले. बचावकार्य सुरू करण्यात आले, परंतु तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. मृत अमोल शेलकर यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

# पाच हजार रुपये मताचा भाव; सटोडे व भूमाफिया रिंगणात

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला:** सटोड्यांनी अकोला महापालिका निवडणुकीत पैसा ओतला असून त्याचा फटका आता चांगल्या उमेदवारांना बसत आहे. सटोडे पाच हजार रुपये मतांनी पैसे देण्यास तयार असल्याची माहिती समोर आली आहे. पण, या बाबत पुष्टी झाली नाही. नेमका कोणता सटोडा रिंगणात आहे आणि किती पैसे वाटणार आहे, याची चर्चा बाजारपेठेत चांगलीच सुरु झाली आहे. पाच हजार रुपये पुर्ण परिवाराचे कि एका मताचे अशी विचारणा उत्सुक मतदारांमध्ये आहे. सटोड्यांबरोबर जुने शहरातील एका भूमाफियांनी देखील पाच हजार रुपये मत देण्याची तयारी सुरु केल्याची चर्चा रंगली आहे. या विषयाची चर्चा बाजारपेठेत आहे. त्यामुळे अनेक इच्छूक उमेदवारांनी काढता पाय घेतल्याची माहिती आहे. तर काहींनी मतदार हे पैसे घेत दूसऱ्यालाच मतदान करण्याची मानसिकता ठेवत असल्याची चर्चा आहे. ही केवळ चर्चा आहे की वास्तविकता याचा तपास निवडणुक यंत्रणेने करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### ते राजकीय पक्ष कोणते

सटोड्यांना तिकिट देणारे राजकीय पक्ष कोणते असा प्रश्न उपस्थित होत असून भूमाफियांना तिकिट देण्यात नेमक्या कोणत्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी किती कोटी रुपये घेतले याची पण चर्चा राजकीय वर्तुळात आहे. शहरातील भूखंडाचे श्रीखंड खाणाऱ्या आणि गरिबांना लुटणाऱ्या सटोड्यांना तिकिट दिले तरी कोणी याची चर्चा रंगली असून झिरोचा पैसा आला कुठून अशी विचारणा आता होत आहे. लवकरच सटोड्यांना तिकिट देणाऱ्या राजकीय नेत्यांच्या नावाची पण माहिती समोर येणार असून भूमाफियांचे श्रीखंड खाणारे राजकीय नेते कोण अशी विचारणा आता सुरु झाली आहे.




C M Y K

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# इसमास दोन घातक शस्त्रासह अटक



प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा तलवार व कोयता चाकु घेवुन उस्मान नगर येथिल सार्वजनिक रोडवर गुन्हा करण्याच्या उददेशाने उभा आहे अशा मिळालेल्या माहिती वरून .पो.नि. . संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे नामे शेख मोहसिन शेख रहिम वय २० वर्ष रा. उस्मान नगर, अमरावती. यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी तलवार व एक लोखंडी कोयता चाकु जप्त करून सदर इसमा विरुध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव शेख मोहसिन शेख रहिम वय २० वर्ष रा. उस्मान नगर

## ♦ अमरावती गुन्हे शाखेची कारवाई

अमरावती असे असून जप्त करण्यात आलेला मुददेमाल मध्ये एक लोखंडी तलवार कि.अ. १०००/- रू एक लोखंडी कोयता चाकु कि.अ.७००/- रू असा एकुण कि.अ. १७००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदर ची कारवाई पोलीस आयुक्त . राकेश ओला पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखील गेडाम, संदीप खडारे यांनी केली आहे.

# एका इसमाच्या ताब्यातून देशी कट्टा व एक जिवंत काडतूस केले जप्त

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी ३ जानेवारी



**अमरावती :** पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती महानगर पालीका निवडुक असल्याने निवडणुकी दरम्यान काही समाजकंठक इसम हे अवैधरीत्या स्वंता जवळ शस्त्र बाळगुण निवडणुक प्रकीये मधे अळथळा निर्माण करता अशा समाजकंठक इसमांनवर प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेश दिल्यावरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.

दि. ०२/०१/२०२६ रोजी गुन्हेशाखा चे पोलीस निरीक्षक, संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात घातक शस्त्राबाबत मोहीम राबवली असता पथकाला गुप्त माहीती मिळाली की, पो.स्टे. सिटी कोतवाली हददीतील बस स्टॅन्ड रोड वरील सायन्सकोर मैदनचे भिंती लगत एक इसम नामे नावेद अहेमद उर्फ अन्ना अब्दुल वारीस वय २६ वर्ष रा. लालखडी, मदरसा जवळ, अमरावती. हा अग्नीशस्त्र सारखे घातक शस्त्र कंबरेला लावून उभा आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून गुन्हे शाखेच्या पथकाने सायन्सकोर मैदनचे भिंती लगत जावून मोठ्या शिताफीने त्याला ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून एक देशी कटटा (पिस्टल) व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. नमूद आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापुर्वी आयुक्तालयात गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच ताब्यात घेतलेल्या इसमांस अग्नीशस्त्रा बाबत विचापुस केली असता सदरचे अग्नीशस्त्र हे त्याचा मित्र शेख शहजाद उर्फ गडु तुफान रा. गौस नगर, अमरावती याचा असल्याचे सांगीतले वरून दोन्ही नमूद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे कलम ३/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५, मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव नावेद अहेमद उर्फ अन्ना अब्दुल वारीस वय २६ वर्ष रा. लालखडी, मदरसा जवळ, अमरावती असे असून फरार आरोपीचे नाव शेख शहजाद उर्फ गडु तुफान रा. गौस नगर, अमरावती आहे. जप्त करण्यात आलेला मुददेमाल एक नग देशी कटटा (पिस्टल) कि.अं. ३५०००/-रू, एक नग जिवंत काडतूस(रांउड)कि.अं. १०००/- रू,असा एकुण ३६,०००-०० रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त . राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखे चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार - गजानन ढेवले, मंगेश परिमल, मनोज ठोसर, मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, योगेश पवार, सागर ठाकरे, संदीप खंडारे यांनी केली आहे.

# 161 उमेदवारांनी माघार घेतली, 661 उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती:** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात आता एकूण ६६१ उमेदवार आहेत. नामांकन मागे घेण्याच्या दोन दिवसांत एकूण १६१ उमेदवारांनी माघार घेतली माघारीचा शेवटचा दिवशी एकूण १५० जणांनी आपले अर्ज मागे घेतले. गुरुवारी ११ जणांनी आपले अर्ज मागे घेतले.

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या आगामी महानगरपालिका निवडणुकीची तयारी जोरात सुरू आहे. निवडणूक वेळापत्रकानुसार, काल नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. आज दुसऱ्या दिवशी १५० जणांनी आपले अर्ज मागे घेतले. निवडणूक चिन्ह वाटप होणार आहे. गुरुवार आणि शुक्रवारी, नामांकन मागे घेण्याच्या दोन दिवसांत एकूण १६१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.

झोन १ मधून १९, झोन २ मधून २८, झोन ३ मधून २६, झोन ४ मधून २३, झोन ५ मधून २८, झोन ६ मधून १४ आणि झोन ७ मधून २३ उमेदवार निवडणूक चिन्ह वाटपानंतर उद्यापासून प्रचाराला सुरुवात होईल. अपक्ष उमेदवार त्यांच्या उमेदवारी चिन्हांची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## भाजपने स्वाभिमान पक्षाच्या तीन उमेदवारांना पाठिंबा दिला

◆ भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी युवा स्वाभिमान पक्षाच्या तीन उमेदवारांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. यामध्ये प्रभाग ११ फ्रेझरपुरा येथून सूरज भरत चौधरी, रुक्मिणी नगर, प्रभाग २१ जुनी बस्ती बडनेरा येथून किरण बसंतराव अंबाडकर आणि प्रभाग १७ गडगडेश्वर रविनगर येथून प्रियंका भूषण पाटणे यांचा समावेश आहे.

# हायकोर्टाने याचिका फेटाळून लावली, तुषार भारतीयांचे षडयंत्र दुसऱ्यांदा फसले, कोर्टाने दिला दणका

## उमेदवार सचिन भेंडे यांना मिळाला न्याय
## साई नगरात सचिन भेंडे यांच्याबाबत सहानुभूती अधिक बळावली

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १९ (साई नगर) येथे राजकीय वातावरण तापले आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे कर्तव्यदक्ष व सामान्य कार्यकर्ता सचिन भेंडे यांना निवडणूक लढवण्यापासून रोखण्यासाठी दाखल करण्यात आलेली खोटी तक्रार पूर्णपणे निष्फळ ठरल्यानंतर विरोधी उमेदवार तुषार भारतीय यांनी थेट हायकोर्टात धाव घेतली. मात्र, हायकोर्टानेही ही याचिका फेटाळून लावत तुषार भारतीय यांना जोरदार दणका दिला आहे. त्यामुळे दुसऱ्यांदाही त्यांचे षडयंत्र अपयशी ठरले आहे. या प्रकारामुळे आता मतदारांच्या 'कोर्टात' देखील तुषार भारतीय यांना चांगलीच चपराक बसणार, अशी चर्चा प्रभागात रंगली आहे यापूर्वीही तुषार भारतीय यांनी तक्रार दाखल करून सचिन भेंडे यांचा निवडणूक अर्ज अवैध ठरवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र,



निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व बाबींची तपासणी करून सचिन भेंडे यांची उमेदवारी वैध ठरवली. यामुळे सत्याचा विजय झाला असून, दबावतंत्र राबवण्याचे सर्व प्रयत्न अपयशी ठरल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर त्यांच्या वकिलांनी ठोस पुराव्यांसह बाजू मांडल्याने अखेर उमेदवारी कायम ठेवण्यात आली. या निर्णयासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात रात्री उशिरापर्यंत सुनावणी सुरू होती. विविध स्तरांवरून दबाव आणण्याचे प्रयत्न झाले, तरीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सचिन भेंडे यांचा अर्ज पात्र ठरवण्यात आला. त्यामुळे एका सामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळाल्याची भावना जनसामान्यांत व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना आमदार रवी राणा यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की, हा तर सत्याचा विजय आहे. साई नगरातील जनता हे सर्व खुल्या डोळ्यांनी पाहत आहे आणि या यांचे सडेतोड उत्तर मतदानाच्या वेळी देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# वीज कनेक्शन हमखास वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती :** १ जानेवारी २०२६: ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते. सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे.

# पोलिस दलाचा स्थापना दिवस साजरा

प्रतिनिधी ३ जानेवारी



**अमरावती :** महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना २ जानेवारी १९६१ रोजी झाली. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या दिवशी महाराष्ट्र पोलिसांना ध्वज प्रदान केला.

हा दिवस पोलीस दलाच्या स्थापनेचा स्मरणदिन असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेबद्दल विश्वास निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो महाराष्ट्र पोलीसांचे ब्रीदवाक्य आहे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'. याचा अर्थः 'सज्जनांचे रक्षण करणे आणि खलनायकांचे (दुष्टांचे) दमन करणे.' असा होतो. रात्रंदिवस कर्तव्य पार पाडणा-या पोलीस दलाची माहिती जवळुन होण्याकरिता पोलीस वर्धापन दिन दिनांक ०२ जानेवारीला दर वर्षी साजरा करण्यात येतो. पोलीस वर्धापन दिन हा फक्त औपचारिक उत्सव नसून

## ♦ पोलीस आयुक्तांची उपस्थिती

समाजातील शांती, सुरक्षितता आणि न्याय यांचे प्रतीक आहे. या दिवशी पोलीस दलाच्या त्याग, शौर्य आणि निष्ठेचा गौरव केला जातो. पोलीस मुख्यालय व पोलीस स्टेशन स्तरावर शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता तसेच नागरिकांसाठी शस्त्र, आधुनिक उपकरणे, व पोलीसांचे कार्यपद्धतीची माहिती देण्यात येते.

दिनांक ०२.०१.२०२६ रोजी ११.०० वा. पोलीस कवायत मैदान अमरावती शहर येथे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी पोलीस वर्धापन दिन-२०२६ चे उद्घाटन केले. रेझिंग डे निमीत्त प्रदर्शनीतील शस्त्र, सायबर, महिला व बाल अत्याचार, दामिनी पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, डायल-११२, दंगा नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक, श्वान पथक, बिनतारी संदेश विभाग, वाहतुक शाखा, इत्यादि विविध स्टॉल लावुन पोलीस दलातील आधुनिक यंत्रसामुग्रीची माहीती विद्यार्थाना देण्यात आली. सदर प्रदर्शनी दिनांक ०३.०१.२०२६ पर्यंत ०३.०० वा. पर्यंत पोलीस कवायत मैदान येथे राहणार असुन विद्यार्थी व नागरिकांनी पोलीस दलाची जवळुन माहीती घेण्यास खुली असुन त्याचा लाभ घेण्याचे आवाहन मा. पोलीस आयुक्त यांनी केले आहे. पोलीस वर्धापन दिना निमित्त उद्घाटन प्रसंगी श्री. शाम घुगे पोलीस उपायुक्त परि-०२, श्री. गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त, परि-०१, श्री. रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त, मुख्यालय तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. जी. एच. रायसोनी युनिवर्सिटी, मनपा मराठी मुलांची शाळा वडरपुरा, मनपा उर्दू हायस्कुल, जमील कॉलनी, जवाहर नवोदय विद्यालय अमरावती, जि.प. उर्दु कन्या शाळा, कॅम्प अम., तोमय इंग्लीश मेडीयम स्कुल, एस डि. एफ. प्रायमरी स्कुल, कांतानगर, मनपा मराठी मुलींची शाळा बुधवारा, मनपा हिंदी मुलांची शाळा, तालाबपुरा अमरावती येथील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित राहुन पोलीस दलाचे कामाकाजाची जवळुन माहीती घेतली.

# महानगरपालिका निवडणूक आचारसंहितेमुळे जिल्हा लोकशाही दिन रद्द

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती :** महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५-२६ निमित्त लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयात होणारा जिल्हा लोकशाही दिन साजरा केला जाणार नाही.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार, दि. १९ जानेवारी २०२६ (सोमवार) पर्यंत आचारसंहिता लागू असल्याने, हा निर्णय घेण्यात आला आहे.

# माजी खासदार नवनीत राणा यांनी केले पालकमंत्र्यांचे स्वागत



प्रतिनिधी ३ जानेवारी

**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक प्रभारी आमदार संजयजी कुटे, विदर्भ संघटन मंत्री उपेंद्रजी कोठेकर, भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे व आमदार रवी राणा यांची दीड तास बंदद्वार चर्चा.युवा स्वाभिमान भाजपामध्ये राहणार मैत्रीपूर्ण लढत.

हम साथ साथ है ची घोषणा आमदार रवी राणे यांनी दिली.



# मामाने भाच्यावर लोखंडी रॉडने केला हल्ला

प्रतिनिधी ३ जानेवारी

**खामगाव :** शहरातील चांदमारी घरकुल परिसरात कौटुंबिक वादातून मामाने भाच्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी मामासह दोघाजणांविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, आशिष दयानंद साबळे (वय ३८, रा. चांदमारी घरकुल, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी व आरोपी हे नात्याने मामा-भाचे आहेत. आरोपी धीरज सदानंद कसबे (५५, रा. गजानन कॉलनी, खामगाव) व सचिन सदानंद कसबे (५०, रा. शेगाव रोड, खामगाव) हे फिर्यादीच्या घरासमोरील रस्त्यावर आले. क्षुल्लक कारणावरून वाद सुरु केला. वादाचे रूपांतर थेट मारहाणीत झाले.आरोपी धीरज कसबे याने हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीच्या पाठीवर वार केल्याचा आरोप आहे.

या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली. त्याच वेळी आरोपी सचिन कसबे याने मारहाण करून शिवीगाळ केली; तसेच हातपाय तोडून टाकू, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ११५(२), ३५१(२), ३५२ व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास संतोष गव्हाळे करीत आहेत.

# ७५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

प्रतिनिधी ३ जानेवारी

**खामगाव :** महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वनविभागाच्या तपासणी नाक्यावर वनविभागाने सतर्कतेने मोठी कारवाई करत मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा तब्बल ७५ लाख रुपये किमतीचा विमल गुटखा व पान मसाला जप्त केला.

जळगाव जामोद तालुक्यातील सातपुडा पायथ्याशी असलेल्या वनविभागाच्या नाक्यावर वनकर्मचारी रात्री गस्तीवर असताना, मध्यप्रदेशकडून महाराष्ट्रात येणाऱ्या आयशर ट्रक क्र.एम एच ३० बीडी ७५८५ ची संशयावरून तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत सदर ट्रक ताब्यात घेतला.या प्रकरणाची माहिती स्थानिक पोलिसांना देण्यात आल्यानंतर पुढील कारवाईसाठी ट्रक पोलीस ठाण्यात लावण्यात आला. सीमावर्ती भागात अवैध गुटखा वाहतुकीविरोधात वनविभागाने घेतलेली ही भूमिका उल्लेखनीय ठरत आहे.

# ट्रॅक्टरखाली दबल्याने 20 वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

## ♦ मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद

प्रतिनिधी ३ जानेवारी

**खामगाव :** मलकापूर तालुक्यातील रनगाव शिवारात ट्रॅक्टरखाली दबल्याने एका २० वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी घडली. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतकाचे नाव मल्हार विनोद फासे (वय २० वर्षे, रा. हिंगणकाझी, ता. मलकापूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रनगाव शिवारात ट्रॅक्टरखाली दबून गंभीर जखमी झालेल्या मल्हार फासे यांना त्यांच्या नातेवाईकांनी तत्काळ उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे आणले. मात्र डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेची उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथील डॉ. स्वाती पाटील यांच्या वतीने वॉर्ड बॉय राजू तुकाराम गोमटे (वय ५२ वर्षे) यांनी दिली. त्यानुसार अकस्मात मृत्यू क्रमांक ०२/२०२६, कलम १९४ "एए अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. ही घटना १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३५ वाजता घडली असून मृतकास दुपारी १.३६ वाजता उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणाची नोंद पोहेकॉ तडवी (ब.नं. ९७८) यांनी केली आहे. या घटनेचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल रविकांत बावस्कार (ब.नं. ६७१) करीत असून, पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार प्रकरण तपासात घेण्यात आले आहे. घटनेचा नेमका कारणपरिस्थितीचा तपास सुरू आहे.

# दमट वातावरणाचा पिकांवर परिणाम



प्रतिनिधी ३ जानेवारी

**खामगाव:** सध्या अधूनमधून ढगाळ वातावरण राहते. दोन तीन दिवसात वातावरणात बदल जाणवत आहे. याचा परिणाम तूर पिकावर होण्याची शक्यता दिसते. कारण ढगाळ वातावरणामुळे अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो.

खूप थंडी, मधूनच ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. पिकांवर तसेच प्रकृतीवर देखील परिणाम जाणवतो. उष्मा कमी अधिक होतो. नाही. पंखे सुरू ठेवावे लागतात. यंदा थंडीचा तडाखा बसला. १०,११ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान खाली आल्यामुळे गारठा प्रचंड प्रमाणात जाणवला. २०२५ मध्ये भरपूर पाऊस, कडाक्याची थंडी जाणवली. आणि आता ढगाळ वातावरण आहे. वारंवार वातावरणात बदल होत असल्याने जगजीवन विस्कळीत होत आहे.

३
# सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त पोलीस दलातर्फे प्रदर्शनी व जनजागृती सप्ताह

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** ०२ जानेवारी २०२६ रोजी साजरा होणाऱ्या महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त अकोला पोलीस दलाच्या वतीने भव्य प्रदर्शनी व जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम ०२ ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत पोलीस लॉन, अकोला येथे सकाळी ९.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

या प्रदर्शनीमध्ये नागरिकांना पोलीस दलाच्या कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व जनसुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. यामध्ये शस्त्र प्रदर्शनी, बॉम्ब शोधक व नाशक पथक, डॉग युनिट, बिनतारी संदेश यंत्रणा, पोलीस वाहने, पोलीस गणवेश, तसेच पोलीस पदकांची माहिती यांचा समावेश आहे.

## श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांच्या ९८ व्या जयंती महोत्सव



प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला:** श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांचा ९८ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांना श्री हनुमान जयंती दिनी साक्षात्कार झाल्यामुळे श्री हनुमान जयंती दिनी दरवर्षी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात यात्रा भरविण्यात येते. दि. २५ डिसेंबर ते १ जानेवारी पर्यंत देव वाकी येथे श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या जयंती महोत्सवामध्ये नामवंत प्रवचनकारांची प्रवचने झाली यामध्ये श्री जीवणे गुरुजी, श्री नारायण मते, श्री ज्ञानेश्वर सात, श्री संजय महाराज वानखडे, श्री बाबुलाल महाराज मोरे, श्री नामदेव महाराज टापरे यांची किर्तने यावे संपन्न झाली.

# अकोला पोलिस दलाचा डिजिटल झेप ; 'स्मार्ट पोलिसिंग' चा ठोस प्रारंभ




## ♦ नागरिकांच्या थेट सेवेसाठी 'अकोला कॉप कनेक्ट' व्हॉट्स ॲप चॅटबॉट कार्यान्वित

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला:** नागरिक–पोलीस संवाद अधिक वेगवान, पारदर्शक आणि तंत्रस्नेही करण्याच्या दिशेने अकोला जिल्हा पोलीस दलाने निर्णायक पाऊल टाकले आहे. महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२६ या औचित्यावर 'अकोला कॉप कनेक्ट' या एआय आधारित व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवेचा भव्य शुभारंभ करण्यात आला. नागरिकांना पोलिसांच्या विविध सेवांपर्यंत घरबसल्या, एका क्लिकवर पोहोचता यावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या अत्याधुनिक सेवेचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते पार पडला. यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने, वनसंरक्षक सुमन सोळंके, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, पोलीस अधीक्षक (गुन्हे) ईशानी आनंद यांच्यासह प्रशासकीय व पोलिस यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'स्मार्ट पोलिसिंग' संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीचे स्वरूप देत, अकोला पोलिसांनी या व्हॉट्सॲप चॅटबॉटची निर्मिती केली आहे. नागरिकांसाठी ९४०३५५३११७ हा अधिकृत क्रमांक जाहीर करण्यात आला



असून, या एकाच क्रमांकावरून पोलिसांच्या तब्बल १७ सेवांची माहिती २४ बाय ७ उपलब्ध होणार आहे.

**तंत्रज्ञानाच्या बळावर लोकाभिमुख पोलिसिंग**

'अकोला कॉप कनेक्ट' चॅटबॉटमुळे जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे संपर्क क्रमांक, प्रभारी अधिकाऱ्यांची माहिती, ई-मेल, सोशल मीडिया हँडल्स आणि गुगल लोकेशन थेट व्हॉट्सॲपवर मिळणार आहे. याशिवाय ऑनलाइन तक्रार नोंदणी, तक्रारीची सद्यस्थिती, ई-चालान, पासपोर्ट व चारित्र्य पडताळणी यांसारख्या महत्त्वाच्या सेवांसाठी आवश्यक मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात आले आहे. मराठी व इंग्रजी द्विभाषिक सुविधा ही या उपक्रमाची आणखी एक जमेची बाजू ठरते. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल जुमळे, एपीआय मनिषा तायडे, पोस्टे सायबरचे भूषण अरुण रंभापुरे यांनी या उपक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अकोला येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी गौरव पवार, महेश डोंगरे, गौरी चेटुले, भावेश खोसे आणि जव्वाद बेग यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत चॅटबॉटच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले.

**वापरण्याची सोपी प्रक्रिया**

१) ९४०३५५३११७ हा क्रमांक मोबाईलमध्ये सेव्ह करा
२) 'हाय ' किंवा 'हॅलो' असा मेसेज इंग्रजीत पाठवा
३) भाषा निवडा आणि आवश्यक सेवा निवडा

**पोलीस अधीक्षकांचा ठाम संदेश**

नागरिक-पोलीस संवाद अधिक सुलभ, पारदर्शक आणि लोकाभिमुख करणे हाच 'अकोला कॉप कनेक्ट'मागील मुख्य उद्देश आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांना घरबसल्या पोलिस सेवांचा लाभ मिळावा, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. अकोला पोलीस दल नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे.'

**– अर्चित चांडक**
पोलीस अधीक्षक, अकोला

## जठारपेठ येथील वाचनालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर संपन्न

**अकोला:** पोलीस भरती परीक्षा येत्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा इतर स्पर्धा परीक्षा होऊ घातल्या आहेत. या सर्व परीक्षांना कसे सामोरे जावे व अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन शिबिर ' जठारपेठ परीसरातील अरुण दिवेकर सार्वजनिक वाचनालय' येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष निखीलेश दिवेकर यांनी केले. या कार्यक्रमात ज्ञानज्योत अकॅडमीचे संचालक प्रा निखील पातोंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत अश्या स्पर्धा परीक्षांना कसे सामोरे जावे याचे तांत्रिक मार्गदर्शन केले.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी ३ जानेवारी

**बोरगाव:** उज्वल पब्लिक स्कूल बोरगाव येथे आज समाजसुधारक, शिक्षणप्रेमी आणि स्त्रीशक्तीच्या प्रतीक असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला नरेंद्र सोनवणे होत्या. निता राजेंद्र बोबडे व स्मिता पाटील उपस्थित होत्या.

कार्यक्रमात मुबाशीर इलियास खान, कल्याणी इंदाने व धनश्री खोडके या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनशैलीवर प्रभावी भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. शिक्षिका स्वाती जैन यांनी सावित्रीबाईंच्या जीवनपटावर सखोल प्रकाश टाकत त्यांच्या कार्याचा गौरव केला. रुद्रायणी भराटे आराध्या इंदाने यांनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेत सादर केलेली झलक विशेष आकर्षण ठरली. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली व सावित्रीबाईंच्या कार्याची आठवण ताजी झाली. सदर कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका कुमुद काटोले यांनी



अत्यंत नेटकेपणाने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका मोहिनी इंगळे, मीना सराटे, प्रीती वाघमारे, जया हगवणे, दुर्गा असोलमोल, दिपाली देशमुख, पूजा तळोतकर, रूपाली कडू ,साक्षी इंगळे, शारदा देशमुख तसेच शिक्षक प्रशांत होणाले, प्रतीक वानखडे, रूपाली इंगळे व सौ. पूजा गावंडे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कुमुद यांनी तर आभार प्रदर्शन सौ. अश्विनी माहुलकर यांनी केले.

# अफवांना मूठमाती देत मतदारांनी भाजपाला एक हाती सत्ता दिली : खासदार अनुप धोत्रे

प्रतिनिधी ३ जानेवारी

**हिवरखेड :** येथे नगराध्यक्षासह मतदारांनी ११ नगरसेवक निवडून देऊन भाजपाला एक हाती दिल्याबद्दल हिवरखेडच्या मतदारांचे आभार. काही वर्षापासून विरोधी पक्षांकडून अफवा पसरवल्या जात होत्या. मात्र भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांची जाण ठेवून ग्राउंड लेव्हलवर काम करणारा पक्ष आहे त्यामुळे सर्व काम मार्गी लागले व पुढेही मतदारांची कामे करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे व ११ नगरसेवकांच्या पदग्रहण कार्यक्रमात बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश भारसाकळे हे होते. तर प्रमुख उपस्थितीत उमेश पवार, अकोला जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष जयश्री फुंडकर,अकोट मंडळ अध्यक्ष गोपाल मोहोड, हिवरखेड मंडळ अध्यक्ष मंगेश दुतोंडे, कुलदीप तराळे हे होते. आमदार प्रकाश भारसाकळे यांनी सुद्धा हिवरखेडच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे वचन दिले. नवनिर्वाचित अध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे यांनी गावातील प्राथमिक सुविधांवर भर देऊन सर्वांगिक विकास करण्याचे आश्वासन दिले.

नगरसेविका वंदना राजेश वानखडे, प्रतिभा वीरेंद्र येऊल, प्रमिला रवींद्र मानकर ,अनिता रवींद्र वाकोडे, वैशाली गणेश वानखडे, दिपाली संदीप इंगळे, दीपक बाबन रायबोले, रोशन खा रसूल खा, अजीज खान जमीर खान, वैभव रमेश गावंडे, प्रथमेश श्रीराम नाठे यांचा खासदार अनुप धोत्रे व आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून नगरसेवक पदाकरता उभे असलेले व निवडणुकीत अयशस्वी झालेले वंदना शांताराम कवळकर, गायत्री सत्यम भोपळे, सुलभा दशरथ गावंडे, मुमताज बानो सय्यद एजाज अली, पंकज तिडके, विनोद ढबाले, वारीस खा गुलशेर खा, सय्यद अजहर सय्यद उमर यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अकोट विधानसभा विस्तारक रमेश दुतोंडे यांनी केले तर संचालन महेंद्र कराळे यांनी केले. आभार भाजपा शहराध्यक्ष किरण सेदानी यांनी मानले.

## निधन वार्ता

**रत्नकलाबाई काळे**



**अकोट :** येथील यात्रा चौकातील सुनील काळे यांची आई रत्नकलाबाई काळे यांचे २९ डिसेंबर रोजी निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या . त्यांच्या पश्चात दोन मुले व चार मुली असा आप्त परिवार आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शाळेच्या ग्रंथालयाला पुस्तक संच भेट

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला:** स्त्रियांसाठी साक्षरतेची वाट प्रकाशमान करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती शनिवार रोजी खेंडकर ज्ञानगंगेच्या परिसरात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स्व. यमुनाबाई खेंडकर मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर तसेच संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. मृणालिनी ताई खेंडकर व संस्थेच्या सहसचिव सौ. अस्मीताताई



खेंडकर, ओमप्रकाश इंगळे उपस्थित होत्या. स्त्री शक्तीचा आवाज आणखी बुलंद करण्याचा संकल्प करीत क्रांतीज्योतीला अभिवादन करण्यात आले. देशातील पहिली मुलींची शाळा सुरू करणाऱ्या शिक्षणाची आराध्यदैवत असणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या जीवाचे रान करून स्त्रियांना शिक्षण देण्याचे व जनजागृती करण्याचे मोलाचे कार्य केले, असे प्रतिपादन केले.

दरम्यान यावेळी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त खेंडकर विद्यालयाच्या ग्रंथालयाला पुस्तक संच भेट देऊन एक उत्तम उपक्रम व वाचनाचा संदेश देण्यात आला, थोर महापुरुषांवरील आत्मचरित्रे, शिक्षण आणि स्त्री-पुरुष समानतेवर आधारित पुस्तके विद्यार्थ्यांना प्रेरणा देतील आणि त्यांचे ज्ञान वाढवून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देईल, असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शाळेच्या ग्रंथालयाला एकुण ५० पुस्तकांचा संच नारायणराव खेंडकर कॉन्व्हेंट मधील नर्सरी मध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थी यश ओमप्रकाश इंगळे याचा क्रांती ज्योती सावीत्रीबाई फुले यांच्या जयंती दिवशीच म्हणजेच ३ जानेवारी ला वाढदिवस असून त्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शाळेला भेट म्हणून पुस्तक संच देऊन एक आदर्श उदाहरण सर्वांना दिले आहे. यावेळी कार्यक्रमाचे संचालन उषा जगदाळे यांनी केले, तर आभार गोपाल वानखडे यांनी व्यक्त केले.

# गुरू गोविंदसिंहजी यांच्या प्रकाश उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला:** गुरू गोविंदसिंहजी यांच्या ३५९ व्या प्रकाश उत्सव निमित्त गुरूद्वारा मध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. १ जानेवारी पर्यंत प्रभात फेरी काढली. तसेच कीर्तन दिवानचे आयोजन करण्यात येत आहे. रात्री ८ ते १० श्री अखण्ड पाठ साहिब पाठ. हजुरी रागी जत्था व भाई कवलप्रितसिंह निक्केगुमन. रविवार दुपारी आणि रात्री हजुरी रागी जत्था व भाई कवलन्तिसिंह निक्केगुमन (गुरुदासपुर) यांचे किर्तन व गुरुचा लंगर, श्री अखण्ड पाठ साहिबजी समाप्ती झाली. सोमवार ०५ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १०.३० निशान साहिबजी चोला बदली करण्यात



आली. १३ जानेवारी रोजी लोहडी दहन होणार आहे. समाजबांधवांनी त्यात सहभागी व्हावे असे आवाहन श्री गरूद्वारा सिंघ सभेच्या वतीने करण्यात आले आहे. श्री गुरूद्वारा प्रबंधक समितीचे अध्यक्ष प्रमेन्दरसिंह ओबेरॉय, उपाध्यक्ष संतसिंह ओबेरॉय, सचिव जोगिंदरसिंह सेठी व गुरुद्वारा प्रबंधक कमेटी अकोलाचा आयोजनात सहभाग आहे.

# लाखपुरी येथील अर्चना विद्यालयामधील माजी विद्यार्थी मेळावा व कृतज्ञता सोहळा



प्रतिनिधी ३ जानेवारी

**मुर्तिजापुर:** लाखपुरी येथील अर्चना विद्यालयात १९८३ -१९८४ मधील १० वीच्या माजी विद्यार्थी मेळावा १ जानेवारीला झाला. सरस्वती पुजन व महापुरुषाचे प्रतिमा पुजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मधुकरराव कोकाटे होते.

अ.शे. देशमुख , डी. यु. राजपूत, के. एन. राऊत, प्रा. गडगीकर, अशोक कोथळकर , कुरेकर ,श्रीकृष्ण हिंगणकर , आर. एम .भुतडा, मुख्याध्यापक संजय राजपुत, एस. पी. नाचणे , एस . एस. डोंगरे , जी. टी. राऊत ,महादेव ढाकरे , गोवर्धन जोगी उपस्थित होते व माजी विद्यार्थ्यांनमध्ये सतीष चौहान , रामदास भोपत ,महेंद्र नवघरे , हेमप्रकाश मेहर , दिलीप सुरजुसे , मधुकर जामनिक ,मनोज शर्मा ,रामकृष्ण पोटे ,रघुनाथ वानरे ,पुरुषोत्तम घनमूळे , अनिल चौधरी ,अरुण कोकाटे ,यादव जामनिक ,किसन बावणे ,रंगराव जामनिक ,गजानन धानोरकर ,सुरेंद्र चौहान , मनोहर अवघाते,प्रकाश विचुरकर , ज्योती व्यास , शोभा कानकिरड, अन्नपूर्णा खंडारे , सुनिता गावंडे ,अरुणा खारोळे , शितल शर्मा , संतोषी शर्मा सह अर्चना विद्यालयातील शिक्षक वृंद , कर्मचारी वृंद ,उपस्थिती होती. मान्यवरांनी व माजी विद्यार्थांनी मनोगत व्यक्त केले. काही माजी विद्यार्थीनी मनोगत व्यक्त केले. अठरा वर्ष मोफत शिक्षण सेवा दिल्याबद्दल आर. एच . भुतडा यांचा सन्मान चिन्ह भेट वस्तू देऊन व सत्कार करण्यात आला. माजी सैनिक लक्ष्मीनारायण कैथवास, तुळशीराम वरणकर व सेवानिवृत्त मुख्याध्यापक , शिक्षक , शिक्षेत्तर कर्मचारी यांचा भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन दिपाली काळे यांनी केले तर आभार रामदास भोपत यांनी मानले.

# शेगावला पायदळ वारी करणाऱ्या भाविक भक्तांना अन्नदान

प्रतिनिधी ३ जानेवारी

## ♦ मार्कस शोरूम मिस्टर डेनिम जठारपेठ मित्र मंडळाचा उपक्रम

**अकोला :** विदर्भाचे आराध्य दैवत असलेल्या संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी नवीन वर्षानिमित्त पायदळ वारी करणा-या भाविक भक्तांना मार्कस शोरूम मिस्टर डेनिम जठारपेठ मित्र मंडळाच्या वतीने अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शुभम गासे, तुषार कळमकर, चंद्रांशु मानकर, चेतन राऊत, अभिजीत काळे, सागर जामोदे, गणेश बोंडे, नंदू जिरेकर, संचित सुरोशे, शुभम घुसे, प्रशिक खोब्रागडे, योगेश कट्यारमल, आदित्य मोडक, शिवा अडायकर, श्रीकांत नवलकर, श्याम दाहे, गजानन शिंदे, यश कोरडे, देवा पाटील, ओम ठाकूर, दादू मोरे, मंथन उमाळे यांचे सहकार्य लाभले. या अन्नदानाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला.



# सेंट पॉल पब्लिक स्कूलच्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत खेळाडूंना २ सुवर्ण पदक

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोट:** राष्ट्रीय खेळ जवाहरलाल नेहरू स्टेडियम दिल्ली येथे २६ ते २८ डिसेंबर दरम्यान झाले. भारतातील २५ राज्यातील खेळाडुंचा सहभाग होता. तसेच महाराष्ट्रातील ३०० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता तसेच स्पर्धेकरीता अकोला जिल्ह्यातील अकोट तालुका मधील सेंट पॉल पब्लिक स्कूलच्या २ खेळाडूंची निवड करण्यात आली होती.त्यामधे १४ वर्षाआतील वयोगटात किकबॉक्सिंग या खेळामध्ये कु.सेजल मनोज पारधी, कु.नेहा निखिल खोले



यांनी तामिळनाडू, जम्मू काश्मीर, आंध्र प्रदेश या राज्यांतील खेळाडूंना पराभुत करुन २ सुर्वण पदक प्राप्त केले . विजयी खेळाडुंचे पुढील येणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता निवड करण्यात आली आहे. विजयी खेळाडूंचे एसबीकेएफ इंडियाचे अध्यक्ष पंकज गवले व सचिव शिवा तिवारी यांनी खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन केले तसेच विजय प्राप्त खेळाडूंना संस्था अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरन डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दिपम लखोटिया, प्रा. व्दारिका प्रसाद बसेर, कविता मिश्रा यांनी खेळाडूंचे कौतुक केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या तसेच विजयी झालेल्या खेळाडूंना शा. शिक्षक प्रशांत ठोकळ व अनंत पाचकवडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.खेळाडूंचा संघ अकोला पोहचतात पालक व शिक्षक वर्ग यांनी हार ,शाल व पुष्पगुच्छ देऊन खेळाडूंचे स्वागत केले.

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक क्षेत्र, वणी रंभापूर**
**निलगीरी झाडांचा जाहीर लिलाव**
**वर्षे २०२५-२०२६**

**निलगीरी झाडांचा जाहीर लिलाव**

मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर, येथील विविध विभागातील निलगीरीच्या झाडांची विक्री जाहीर लिलावाने **दिनांक: ०९/०१/२०२६ रोजी ११ वाजता,** मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, कार्यालय परीसर येथे करण्यात येईल. लिलावाच्या अटी शर्ती, व अन्य माहिती दिनांक: ०५/०१/२०२६ पासून विद्यापीठ संकेतस्थळ **www.pdkv.ac.in** वर उपलब्ध आहे. तसेच या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निलगीरी झाडे पहावयास मिळतील तरी इच्छूकांनी लिलावात सहभाग घेण्यापूर्वी निलगीरी झाडांची पाहणी करावी.

**लिलावाचे स्थळ:** मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर

**मुख्य बिजोत्पादन अधिकारी**
**म.प्रा.प्र. वणी रंभापूर**

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## नागरिकांना वेळेत सेवा देणे प्रशासनाची जबाबदारी

प्रतिनिधी ०३ जानेवारी

**यवतमाळ** : प्रत्येक नागरिकाला वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य असल्याचे राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. नारुकुल्ला रामबाबु यांनी आज यवतमाळमध्ये आयोजित जिल्हा स्तरीय आढावा बैठकीत सांगितले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत "आपली सेवा आमचे कर्तव्य" या संकल्पनेनुसार आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी विकास मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे आणि निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी उपस्थित होते. बैठकीत महसूल, पंचायत राज, वन विभाग, आरोग्य, शिक्षण, नगर प्रशासन आदी विभागांनी नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचे मूल्यमापन केले.

## पांढरकवडा नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी आतिश बोरेले विराजमान

### शहराचा सर्वांगीण करणे हेच प्रमुख ध्येय





प्रतिनिधी ०३ जानेवारी

**पांढरकवडा:** स्थानिक राजकारणात प्रतिष्ठेची मानली जाणारी पांढरकवडा नगरपरिषदेची नगराध्यक्षपदाची निवडणूक अखेर पार पडली असून, आतिश उर्फ सोनू भैय्या बोरेले यांनी नगराध्यक्षपदाची धुरा हाती घेतली आहे. अत्यंत चुरशीच्या वातावरणात झालेल्या या निवडीत बोरेले यांच्या नावाची अधिकृत घोषणा होताच शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्ते आणि समर्थकांनी जल्लोष करत हा विजय साजरा केला.

नगराध्यक्ष निवडीची घोषणा होताच पांढरकवडा शहरात गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष करण्यात आला. समर्थकांनी बोरेले यांची भव्य मिरवणूक काढत "सोनू भैय्या तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आज, शुक्रवार २ जानेवारी २०२६ रोजी त्यांनी अधिकृतरीत्या नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नगराध्यक्ष आतिश उर्फ सोनू भैय्या बोरेले यांनी शहरातील नागरिकांचे आभार मानले. "पांढरकवडा शहराचा सर्वांगीण आणि संतुलित विकास करणे हेच माझे प्रमुख ध्येय आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत नागरी सुविधा या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येईल. सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन आणि प्रशासनाशी समन्वय साधून शहराच्या प्रगतीसाठी काम करू," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोनू भैय्या बोरेले यांचा दांडगा जनसंपर्क, सामान्य नागरिकांशी असलेली जवळीक आणि सक्रिय नेतृत्वशैली यामुळे त्यांना हे यश मिळाल्याचे बोलले जात आहे.

## बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरणी आरोपी अटक

### 12 जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी



प्रतिनिधी ०३ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ शहर पोलीस ठाण्याच्या तपासात बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरण उघडकीस आले होते. या प्रकरणी बिहार राज्यातील आरोपी आदर्श कुमार दुबे (वय 20, रा. पंडीतपूर, सारण) याला अटक करण्यात आली आहे. हा प्रकरण अत्यंत किचकट आणि सायबर फसवणुकीशी संबंधित असल्याचे पोलीसांनी सांगितले.

जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा जन्म-मृत्यू निबंधक डॉ. सुभाष शाहाजी धोले यांनी 16 डिसेंबर 2025 रोजी तक्रार दिली होती. तपासात समोर आले की, तालुका आर्णी येथील शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या सॉफ्टवेअरमध्ये सप्टेंबर ते नोव्हेंबर 2025 या कालावधीत 27,397 जन्म नोंदी आणि 7 मृत्यू नोंदी आढळल्या, तर ग्रामपंचायतीची वास्तविक लोकसंख्या केवळ सुमारे 1,400 होती. ही विचित्र बाब पोलिसांच्या संशयास कारणीभूत ठरली. उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु केला गेला. प्राथमिक तपासात समोर आले की, बनावट प्रमाणपत्रांची निर्मिती स्थानिक पातळीवर नव्हे, तर बाहेरील राज्यातून सायबर माध्यमातून केली जात होती. विशेष तपास पथक स्थापन करून बिहार राज्यात आरोपीचा ठावठिकाणा शोधून 30 डिसेंबर 2025 रोजी रात्री 11 वाजता अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता पोलीस तपासासाठी 12 जानेवारी 2026 पर्यंत कोठडी मंजूर करण्यात आली. या तपासात उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने, पोलीस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर, सहा पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पो.उप.नि. सागर भारस्कर आणि इतर पोलीस अंमलदारांचा समावेश असलेल्या संघाने महत्त्वाची कामगिरी बजावली. पोलीस अधीक्षक कुमार चित आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या या तपासात सायबर फसवणुकीचे जाळे उघडकीस आणण्यात यश मिळाले असून, पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## 'आपले सरकार सेवा केंद्र' निवडीबाबत १९६ आक्षेप; तालुका स्तरावर सुनावणी होणार

प्रतिनिधी ०३ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यातील रिक्त ठिकाणी 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आलेल्या आक्षेप आणि तक्रारींबाबत तालुका स्तरावर सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. प्रशासनाने संबंधित अर्जदारांना सुनावणीस उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. शासनाच्या १७ मार्च २०२३ च्या निर्णयान्वये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनुसार, १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी जिल्हा संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली होती. या यादीवरील गुणांकनाविरोधात आलेल्या लेखी आक्षेपांवर ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अर्ज मागवण्यात आले. त्याअंतर्गत बाभुळगाव तालुक्यातून ७०, यवतमाळ तालुक्यातून ९७ आणि आर्णी तालुक्यातून २९ आक्षेप प्राप्त झाले आहेत, एकूण १९६. सुनावणीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. बाभुळगाव तालुका: ६ जानेवारी, सकाळी ११ वाजता, यवतमाळ तालुका: ७ जानेवारी, सकाळी ११ वाजता आर्णी तालुका: ८ जानेवारी, सकाळी ११ वाजता सर्व सुनावणी उपविभागीय अधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे होईल. संबंधित अर्जदारांनी स्वतः किंवा वकिलासह नमूद केलेल्या तारखेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. गैरहजर राहिलेल्या अर्जदारांच्या बाबतीत कायदेशीर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे यांनी सांगितले.

## जिल्हा वार्षिक योजनेत प्रगती, खर्च, दीर्घकालीन विकासावर भर द्या



### जिल्हाधिकारी विकास मीना यांचे निर्देश

प्रतिनिधी ०३ जानेवारी

**यवतमाळ** : जिल्हा वार्षिक योजना आणि अनुसूचित जाती उपयोजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विकासकामांना निश्चित दिशा देणे हा शासनाचा उद्देश असल्याचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सांगितले. त्यांनी सर्व यंत्रणांना गरजाधिष्ठित आणि परिणामकारक कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले, कारण निधी मर्यादित असून त्याचा उपयोग दीर्घकालीन व टिकाऊ विकासासाठी होणे आवश्यक आहे. जिल्हा वार्षिक योजना आणि अनुसूचित जाती उपयोजनाअंतर्गत सन २०२६–२७ च्या प्रारूप आराखड्यासह सन २०२५–२६ मधील प्रस्तावित कामांच्या प्रगतीचा, खर्चाचा आणि पुनर्विनियोजनाचा जिल्हास्तरीय आढावा जिल्हाधिकारी श्री. मीना यांनी घेतला. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, नियोजन अधिकारी सुधाकर आडे आणि विविध शासकीय यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा झाली. जिल्हाधिकारी मीना यांनी सांगितले की कामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेचे पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच निधी खर्चात शिल्लक राहिल्यास त्यामागची कारणे स्पष्ट करून अहवाल सादर करावा. एमएचयुआयडी प्रणालीवर प्रस्ताव मंजूर न झाल्यास कोणत्याही यंत्रणेला निधी वितरित केला जाणार नाही, अशी सूचना देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे सर्व विभागांनी अत्यावश्यक आणि गरजेच्या कामांसाठीच प्रस्ताव सादर करावे. नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांनी सांगितले की सन २०२६–२७ साठीचे सर्व प्रस्ताव तातडीने हार्ड कॉपीसह सादर करून आयपास प्रणालीवर अपलोड करावेत, जेणेकरून पुढील कामकाज सुरळीत पार पडेल. जिल्हाधिकारी श्री. मीना यांनी बैठकीत ठळकपणे स्पष्ट केले की नियोजन, खर्च आणि अंमलबजावणी यामध्ये समन्वय ठेवून काम केल्यास जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान: शेतकऱ्यांचा सामूहिक वाढदिवस



प्रतिनिधी ०३ जानेवारी

**आर्णी** : नववर्षाच्या पहिल्याच दिवशी, १ जानेवारी रोजी मौजे अंबोडा येथील शेतकी शाळेत शेतकऱ्यांचा सामूहिक वाढदिवस अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमामुळे गावात एकोपा, कृतज्ञता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची संकल्पना केवळ वाढदिवस साजरा करण्यापुरती मर्यादित नव्हती, तर याचा उद्देश शेतकऱ्यांच्या कठोर परिश्रमांना आणि त्यांच्या योगदानाला सन्मान देणे होता. विविध वयोगटांतील शेतकरी बांधवांनी एकत्र येऊन केक कापला, एकमेकांना शुभेच्छा दिल्या आणि नववर्षाच्या शुभेच्छाही व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला यवतमाळ जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मेहेत्रे, ग्रामपंचायतीच्या सरपंच वर्षा बाबाराव आडे, पंचायत समिती आर्णीचे गटविकास अधिकारी आर. आर. खरोडे, विस्तार अधिकारी गोविंद इंगोले, बाळकृष्ण ठाकरे, मुख्यमंत्री फेलो गाडगे, प्रसाद कुलकर्णी, प्रतिष्ठित नागरिक विलासजी राऊत, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात माधव रूपसिंग राठोड, सुरेखा विष्णूजी होलगरे, वंदना सुधाकर चव्हाण, ज्ञानेश्वर हुसनाजी जाधव, विनोद परसराम जाधव व आकाश अनिल राठोड यांचा सामूहिक वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी शेतकऱ्यांच्या दैनंदिन संघर्षांबद्दल, बदलत्या हवामानाशी झुंज देत शेती टिकवून ठेवण्याच्या जिद्दीवर चर्चा केली. "शेती ही केवळ व्यवसाय नसून एक जीवनपद्धती आहे. त्या जीवनपद्धतीचा कणा असलेला शेतकरी सन्मानास पात्र आहे," असा ठाम सूर व्यक्त करण्यात आला. या उपक्रमाने सामूहिक आनंद आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला, ज्यामुळे लहान-मोठे, युवक-वृद्ध सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शेतकऱ्यांना आगामी शेती हंगामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आणि नववर्षात भरघोस उत्पादन, योग्य दर, तसेच सुख-समृद्धी मिळो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

## ४ जानेवारी रोजी यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन

### शहरातील काही मार्ग वाहतुकीसाठी बंद राहणार

प्रतिनिधी ०३ जानेवारी




**यवतमाळ** : रविवार, ४ जानेवारी रोजी सकाळी ६ ते ११ वाजेपर्यंत शहरात उत्साहवर्धक यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धेत अंदाजे ३ हजार स्पर्धक सहभागी होत असून, शहरातील रस्त्यांवर तात्पुरते वाहतूक बदल लागू केले आहे. जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अंतर्गत काही मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मॅरेथॉनचा मार्ग नेहरू स्टेडियमपासून सुरु होऊन तहसील चौक, महात्मा फुले पुतळा, जिल्हाधिकारी निवासस्थान, जिल्हा न्यायालय, पोस्ट ऑफिस चौक, स्टेट बँक चौक, कॉटन मार्केट चौक, पॉलिटेक्निक कॉलेज गेट-२, मोहा फाटा, धामणगाव मार्गे करळगाव घाट, वाघाई मंदिराजवळ यु-टर्न घेऊन पुन्हा नेहरू स्टेडियम येथे संपेल. हा अंदाजे ११ किलोमीटर लांब आहे. जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अंतर्गत काही मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पांढरकवडा, शारदा चौक, संविधान चौक वाहतूक भोसा रोड मार्गे वळविली जाईल. दारव्हा, नेर, यवतमाळ वाहतूक संविधान चौक आर्णी रोड नागपूर बायपास रोड मार्गे सुरू राहील. बाभुळगाव, यवतमाळ येणारी वाहतूक करळगांव घाटाखाली थांबविली जाईल (५.४५ ते ११ वाजेपर्यंत बंद). पिंपळगाव, धामणगाव, यवतमाळ मार्ग सकाळी ५.४५ ते १०.३० वाजेपर्यंत बंद राहणार आहे. प्रशासनाने नागरिकांना सूचना दिली आहे की पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि मोटार वाहन कायदा १९५१ चे कलम १३१ उल्लंघन केल्यास कारवाई केली जाईल. सकाळच्या सुरुवातीस वाहनचालकांनी सहकार्य करून उत्साहवर्धक मॅरेथॉन अनुभवाचा भाग व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## "बाळासाहेब देशमुख सवनेकर अजातशत्रू व्यक्तिमत्त्वाचे धनी"



### राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ०३ जानेवारी

**पुसद** : सहकार, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील प्रश्न अत्यंत संयमाने हाताळत सर्वसामान्य माणसाला आपलेसे करण्याची कला बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्याकडे होती. त्यामुळेच ते अजातशत्रू व्यक्तिमत्त्वाचे धनी होते, असे प्रतिपादन राज्यमंत्री ॲड. इंद्रनिल नाईक यांनी केले.

लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त येथील नवचंडिका सभागृहात सोमवारी (ता. ३०) आयोजित अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक वसंतराव पाटील कान्हेकर होते. यावेळी यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील कामारकर, माजी शिक्षण सभापती बी. जी. राठोड, माजी सदस्य शिवाजी देशमुख सवनेकर, दिलीप पारध, भोलेनाथ कांबळे, पुसद पंचायत समितीचे माजी उपसभापती विजय जाधव, दिलीप राठोड, माजी सरपंच मिलिंद उदेपूरकर, राजेश आसेगांवकर, नाना बेले, दिलीप पाटील कान्हेकर, संवेदना सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष किरण देशमुख सवनेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात वसंतराव पाटील कान्हेकर यांनी बाळासाहेब सवनेकर यांनी नाईक परिवारासोबत सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली. शेतकरी, ऊसतोड कामगार, शेतमजूर, वाहनधारक यांच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख केला. संवेदना सोशल फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांवर प्रकाश टाकत सचिव शशिकांत जामगडे यांनी राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'तारे जमीन पर' या उपक्रमासाठी आर्थिक मदत देण्याचे अभिवचन दिले. यावेळी माजी शिक्षण सभापती बी. जी. राठोड यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक किरण देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन साहेबराव राठोड यांनी मानले. कार्यक्रमास विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## अभ्यासात सातत्य ठेवा:मुख्याध्यापक तिरुपती मुंडे

### जिजाऊ ज्ञान मंदिर भांबरखेडामध्ये नववर्षाचे स्वागत



प्रतिनिधी ०३ जानेवारी

**उमरखेड** : उमरखेड- विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी सातत्य ठेवा आणि वेळेचे सुयोग्य नियोजन करा, अशी सूचना मुख्याध्यापक तिरुपती मुंडे यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी आजपासून अभ्यासात कटिबद्ध राहण्याचे संकल्प केले. उमरखेड तालुक्यातील जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, भांबरखेडा येथे १ जानेवारी २०२६ रोजी वर्ष २०२५ ला उजाळा देऊन नवीन वर्षाचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात पहिली ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी पटांगणात बसून "हॅपी न्यू इयर" चे उत्साहपूर्ण सत्र साजरे केले. शाळेचे शिक्षक मनोज चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना नववर्षाच्या संकल्पना करत शिक्षण क्षेत्रात यश मिळविण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, जुने वर्ष आठवून नव्या वर्षाचे स्वागत करताना विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी ध्येय ठरवून त्याचे पालन करावे. या कार्यक्रमास शाळेतील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपमुख्याध्यापिका रामेश्वरी मुंडे, मॅडम कुमारी रोशनी कदम, रेखा पावडे, सुषमा हिंगाडे, मुक्ता कदम, सुषमा कदम, ज्ञानेश्वर शिंदे, सेवक राजू रणखांब, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक धर्माधिकारी सर, सेक्रेटरी कुणाल वानखेडे, सदस्य विजय सुरोशे, विकी वांजाळ, अलका धर्माधिकारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उत्सवाच्या या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये जोश, उत्साह आणि नववर्षासाठी सकारात्मक संकल्प करण्याची भावना रुजली आहे.

# पोखरा योजनेतील भ्रष्टाचार खोल, लवकरच होणार पोलखोल !

## तपास अधिकाऱ्यांकडून चौकशीला वेग





● खाजा शेख @ रिसोड ●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत ( पोखरा ) योजनेतील अनुदान वाटपात गैरप्रकार झाल्याची तक्रार दाखल झाली आहे. मुख्यमंत्री कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांच्या निर्देशानुसार तपास अधिकारी म्हणून येथील तंत्र अधिकारी अनिल तु. राठोड हे सखोल चौकशी करत आहेत. परिणामी तपासाला वेग आला असून खोलवर रुतलेल्या या भ्रष्टाचाराची लवकरच पोलखोल होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तक्रारदार वसंत खडसे यांनी काल दि. २ जानेवारी रोजी काही सबळ पुरावे दाखल केले असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे तपासाला योग्य दिशा मिळाली असून वेग आला आहे.

कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोखरा) मिळणाऱ्या शासकीय लाभाचा गैरवापर केल्याच्या तक्रारींची दखल घेत, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथे वरिष्ठ तपास अधिकाऱ्यांनी धडक दिली. या चौकशीमुळे योजनेतील भ्रष्टाचाराचे गंभीर पुरावे समोर येण्याची शक्यता निर्माण झाली असून, अवैध लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दिनांक २६ डिसेंबर रोजी तपास अधिकारी अनिल राठोड यांच्या पथकाने शेलुखडसे येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. या तपासणीत पोखरा योजनेच्या अंमलबजावणीतील धक्कादायक बाबी समोर येणार असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे.

गट नंबर ६०२ ची तपासणीः या गटात घेतलेले नेटशेड आणि इतर लाभांची अधिकाऱ्यांनी बारकाईने तांत्रिक पाहणी केली आहे.कागदोपत्री दाखवलेला खर्च आणि प्रत्यक्ष स्थिती याची पडताळणी सुरु झाली आहे.करण्यात आली. गट नंबर ६३३ मधील तपासणीत सर्वात मोठा गैरप्रकार समोर येण्याची चिन्हे आहेत. या ठिकाणी आधीच जुनी विहीर अस्तित्वात असताना देखील कागदपत्रांमध्ये फेरफार करून पोखरा योजनेतून नवीन विहिरीचा लाभ घेतल्याचा संशय व्यक्त होत आहे. याच ६३३ गटात दाखवण्यात आलेली फळबाग आणि वनीकरण केवळ कागदावर आहे की प्रत्यक्षात, याचीही नोंद तपास पथकाने केली आहे. झालेला तपास आणि पोखरा योजनेतून घेतलेला अवैध लाभ अंगलट येणार असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे.परिणामी संबंधित लाभार्थी व अफरातफर करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मोठी कोंडी होणार असल्याचे बोलले जात आहे.

### प्रशासकीय चौकशीचा ससेमिरा प्रशासनाचे कडक पाऊल...

राज्याचे मुख्यमंत्री, प्रधान सचिव आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे पुराव्यानिशी तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्याची गांभीयनि दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. आता तपास पूर्ण झाल्यानंतर, शासकीय निधीचा अपहार करणाऱ्यांवर आणि त्यांना साथ देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. चौकशीचा ससेमिरा पाठीमागे लागल्याने आणि भ्रष्टाचार उघड होत असल्याने संशयितांकडून धमकावण्याचे सत्र सुरू झाले होते. मात्र पोलिसांनी वेळीच दखल घेतल्याने या प्रकरणाला आळा बसला आहे.




## थोडक्यात

### मंगरूळपीर विधिज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड.राजेश्वर पांडे

तर सचिव पदी ॲड.वैभव बेलोकार यांची फेरनिवड



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर येथील विधीज्ञ मंडळाची कार्यकारणी ३१ डिसेंबर रोजी गठीत करण्यात आली असून विधीज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. राजेश्वर पांडे, उपाध्यक्षपदी ॲड. मिलिंद बोलके तर सचिव पदी ॲड.वैभव बेलोकार यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विधीज्ञ ॲड. बी. एम. ठाकरे हे होते. विधीज्ञ मंडळाची कार्यकारणी गठीत करण्याच्या दृष्टीने ही बैठक पार पडली.

यावेळी कार्यकारणीत सहसचिव पदी ॲड.सत्यम गिर्डेकर, कोषाध्यक्षपदी ॲड.आशिष मुळे, सहकोषाध्यक्ष पदी ॲड.अजय गवारगुरु तसेच कार्यकारणी सदस्यपदी ॲड.राहुल सुर्वे, ॲड.पंडीत चव्हाण, ॲड.कु.निकिता सावंत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या कामाची प्रक्रिया गतिमान करणे, नवीन वकिलांना अद्यावत ग्रंथालय उपलब्ध करून देणे तसेच कायद्यात होणारे नवनवीन बदल त्यासंबंधी न्याय पुस्तके उपलब्ध करून देणे व विविध वकिलांचे प्रश्न व अडचणी संबंधित त्यांना योग्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासंबंधी नवीन पदाधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. या बैठकीत विधिज्ञ मंडळातील सर्व जेष्ठ व कनिष्ठ विधीज्ञ मंडळी उपस्थित होती.

### एनएसएस प्लस टू चे ग्राम सोहन येथे संस्कार शिबिर



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय कारंजा लाड अंतर्गत एनएसएस प्लस टू चे ग्राम सोहन येथे संस्कार शिबिराचे उद्घाटन थाटामाटात संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर आर. एम. पाटील तसेच उद्घाटक म्हणून सुद्धा कार्य पार पडले बोलतांनी त्यांनी एनएसएस शिबिर हे संस्कार शिबिर असतात याच्यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. यावेळी त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तसेच महात्मा गांधी यांचे उदाहरण देऊन मुलांना संस्कार शिबिराविषयी माहिती स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी आघम डी.डी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका विभा लाहोटी यांनी केले तर सूत्रसंचालन प्राध्यापक स्वप्निल तायडे यांनी केले .

यावेळी मंचावर उपस्थित मुख्याध्यापक मोखडकर, जुनिअर कॉलेज पर्यवेक्षक प्राध्यापक खरड, शाळा व्यवस्थापन सदस्य माननीय भगत, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सौ वैशाली भगत, पोलीस पाटील चंदन बोलके होते झोप रे तसेच समोर उपस्थित सर्व स्वयंसेवक व गावातील मंडळी उपस्थित होते.

## यंत्रणांनी दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहावे - सिईओ अर्पित चौहान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

'दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने व स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी शासनाच्या सर्व योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी विभागांमध्ये समन्वय ठेवून काम करावे. त्यांनी योजनांची अंमलबजावणी वेळेत व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी नियमित आढावा घेण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले.

अपंग व्यक्ती समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम १९९५ तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अंतर्गत जिल्हा व्यवस्थापन संघाची जिल्हास्तरीय समिती आढावा सभा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सिईओ श्री . चौहान बोलत होते. या सभेत दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा व आर्थिक सक्षमीकरणाशी संबंधित विविध योजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी ज्ञानबा पुंड ,जिल्हा अग्रणी बँक



व्यवस्थापक यशवीर कुमार, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव , दिव्यांग सहाय्यक सल्लागार शिवदास काटेकर , दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना अधिक प्रभावीपणे कसा मिळेल, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पुढे बोलतांना सिईओ श्री.चौहान म्हणाले, दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत तरतुदींची माहिती देत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी दिव्यांग सुलभता बाबत आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन केले. शासकीय इमारती, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणी रॅम्प, संकेतफलक व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी दिव्यांग लाभार्थ्यांसाठी उपलब्ध कर्ज योजना, स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य व बँकिंग सुलभतेबाबत माहिती दिली.

उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती व समावेशी शिक्षणाबाबत चालू उपक्रमांची माहिती दिली. सभेत दिव्यांग व्यक्तींचे ओळखपत्र, पुनर्वसन साहित्य वाटप, कौशल्य विकास प्रशिक्षण, रोजगार संधी, आरोग्य तपासणी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्यासाठी संयुक्त चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हास्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आले. ही आढावा सभा दिव्यांगांच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्या संपूर्ण सहभागासाठी प्रशासनाची सकारात्मक भूमिका अधोरेखित करणारी ठरली असून, येत्या काळात अधिक प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी कटिबद्धतेने कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.चित्र दिसून आले.

## रिपाइं च्या वतीने भीमा कोरेगाव शौर्य दिन साजरा !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने स्थानिक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात २०८ वा भीमा कोरेगाव शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .याप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी परिवर्तन कला महासंघाचे अध्यक्ष शेषराव मेश्राम ,रिपाइं युवा जिल्हाध्यक्ष गजानन वानखेडे, सिने अभिनेते अरविंद कुमार उचित , तालुकाध्यक्ष प्रकाश गवई, उपाध्यक्ष संतोष वानखेडे ,सचिन गुडदे ,शाहीर दत्तराव वानखेडे, शाहीर लोडजी भगत ,जिल्हा उपाध्यक्ष सदानंद गवई, अशोकराव कांबळे , जयसिंगराव घुगे, राजेश कांबळे, विष्णू वानखेडे ,सुखदेव सरकटे ,हिरामण साबळे, रवी भगत, रामजी भगत, सिद्धार्थ पाटील ,गजानन राऊत, दिलीप कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते .

कार्यक्रमाचे संचालन व आभार शेषराव मेश्राम यांनी केले.

## जिजामाता कॉन्व्हेंट मध्ये स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा 'आनंद मेळावा'!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नवीन वर्षाचे औचित्य साधून गुरूवार एक जानेवारी रोजी येथील जिजामाता कॉन्व्हेंट मध्ये खरी कमाई अंतर्गत स्काऊट गाईड विद्यार्थ्यां तर्फे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा आनंद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे उदघाटन संस्थेचे सचिव ओम ठाकरे यांचे करण्यात आले.

या प्रसंगी जिजामाता विद्यामंदिर चे पर्यवेक्षक माधव बोंद्रे, स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वैजनाथ





ढगे, एम सी व्ही सी चे प्रा.विठ्ठल गोरे व कॉन्व्हेंट चे प्राचार्य संजय चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या मेळाव्यात स्काऊट गाईड च्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून विक्री केली.या उपक्रमामधून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना खर्च वजा जाता भरपूर नफा प्राप्त झाला. या माध्यमातून स्काऊट गाईड यांना आपल्या जीवनात स्वावलंबी कसे बनावे हे शिकायला मिळाले.

या आनंद मेळाव्यात शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व त्यांचे पालक यांनी सहभागी होऊन विविध खाद्यपदार्थांचा मनसोक्त आनंद घेतला.हा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कॉन्व्हेंटचे प्राचार्य संजय चव्हाण, स्काऊट शिक्षक श्रीकांत कव्हर, गाईड शिक्षिका मंजुषा सुर्वे, सेवक अनिल घोलप, संतोष सावंत व सर्व महिला सेविका यांनी अथक परिश्रम घेतले.

### मतदारांनी दिले मताचे 'दान', सामाजिकतेचे ठेवा 'भान'...

# विकासातून वाढवा शहराची शान - सुभाष ठाकरे

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मतदारांनी मतदानातून दान दिले त्यामुळे सामाजिक भान ठेवून [ विकासातून मंगरूळपीर शहराची शान वाढवा असे प्रतिपादन रुपी भरभरून जे दान केले त्याची उतराई विकास कामातून करेल माजी मंत्री सुभाषराव ठाकरे नगराध्यक्ष परळीकर यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

मंगरूळपीर येथील दिनांक १ जानेवारी रोजी महात्मा फुले चौक येथे मोठ्या दिमाखात अशोक भाऊ परळीकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वीर भगतसिंग महाराणा प्रताप यांना अभिवादन केल्यानंतर नगराचे दैवत प्रंतपस्वी बिरबलनाथ महाराज यांचे दर्शन घेऊन महाआरती करण्यात आली.तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून नगरपालिका येथे पदग्रहण सोहळा झाल्यानंतर अशोक पडळकर यांचे विविध



ठिकाणी स्वागत करण्यात आले.पदग्रहण केल्यानंतर अशोकभाऊ परळीकर यांचा लाडूतुल्ला करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे यांनी असे उद्गार काढले की अशोक भाऊ परळीकर यांना जनतेने भरभरून मतदान केल्यामुळे त्याची उतराई विकास कामातून करण्याची हमी दिली.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत खासदार संजय देशमुख, माझी जिप अध्यक्ष चंद्रकांत दादा ठाकरे, माजी नगराध्यक्ष चंदू भाऊ परळीकर डॉ. सिद्धार्थ देवळे , सुरेश मापारी, नवनिर्वाचित नगरसेवक किरण ताई परळीकरसह नवनिर्वाचित नगरसेवक विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.,नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोक भाऊ परळीकर यांचा वाढदिवस दि.१ जाने रोजी विविध उपक्रमाने पार पडला असून वाढदिवसानिमित्त शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यातील मुख्य कार्यक्रम महात्मा फुले चौकात पार पडला. या कार्यक्रमा ला , प्रमुख अतिथी वाशिम यवतमाळ चे खासदार संजय देशमुख उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोनाली ठाकूर, बिरबलनाथ संस्थांचे सचिव रामकुमार रघुवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे वहीद शेख, उबाठा चे तालुकाध्यक्ष रामदास सुर्वे राम ठाकरे, मीर आशिक अली, उमेश गावंडे, संजय भोयर,तसेच नगरपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य उपस्थित होते. या अभिष्टचिंतन सोहळ्यात शहरातील हजारो नागरिकांनी पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्ष यांचा सत्कार केला यामध्ये वाशिम येथील भावसार समाजाच्या वतीने ही भव्य सत्काराचे आयोजन केले होते,उभाठाचे शहराध्यक्ष सचिन परळीकर, विनोद परळीकर, मुन्ना परळीकर, पंकज परळीकर, मयूर परळीकर , यांच्यानसह संपूर्ण परळीकर परिवार आणि अभिष्टचिंतन सोहळा कृती समिती मंगरूळपीर यांनी परिश्रम घेतले.



मंगरूळपीर नगर परिषदेचे निवडणूक पार पडली असून आता शहराच्या विकासासाठी हेवे दावे आपला परका ह्या सर्व गोष्टी बाजूला ठेवून एकजुटीने कामे करण्यासाठी मला सहकार्य करावे आणि सर्वांनी मिळून शहराचा विकास करू आणि शहराचं नावलौकिक करून इतिहास घडवू

**अशोक परळीकर,** नगराध्यक्ष मंगरूळपीर

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# जिप दिव्यांग बदलीत गैरप्रकार उघड

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत दिव्यांग व गंभीर आजार प्रवर्गाचा गैरवापर झाल्याच्या आरोपांनी गंभीर वळण घेतले आहे. शिक्षण विभागाने कठोर भूमिका स्वीकारली आहे. दिशाभूल करणारा, त्रुटीपूर्ण व अपूर्ण पडताळणी अहवाल सादर केल्याबद्दल अकोट आणि मुर्तिजापूर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणात फौजदारी कारवाईचे स्पष्ट संकेत देण्यात आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

सन २०२५ मधील शिक्षक बदली प्रक्रियेत काही शिक्षकांनी बनावट दिव्यांग तसेच खोट्या वैद्यकीय (गंभीर आजार) प्रमाणपत्रांच्या आधारे बदलीचा लाभ घेतल्याचे गंभीर आरोप समोर आले होते. या संदर्भात गणेश कुरई यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे सविस्तर तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना सखोल पडताळणी करून अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले होते.



मात्र, अकोट व मुर्तिजापूर येथील बीईओंनी १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सादर केलेला अहवाल प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी पूर्णतः फेटाळला. हा अहवाल कोणत्या आधारावर तयार करण्यात आला, याचा उल्लेख नसल्याचे नमूद करत अहवालात मूलभूत त्रुटी, आवश्यक कागदपत्रांचा अभाव आणि तक्रारीतील मुद्द्यांकडे दुर्लक्ष आहे.

दिव्यांग प्रवर्गाच्या झाल्याचा ठपका ठेवण्यात आला नावाखाली सुरू असलेल्या कथित गैरप्रकारांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न झाल्यास, दोषी शिक्षकांसह मदत करणारे अधिकारी, कर्मचारी व संबंधित यंत्रणांवर सुधारित बदली धोरणाच्या गंभीर उल्लंघनाबद्दल कठोर फौजदारी कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा नोटिशीत देण्यात आला आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी नव्याने फेर पडताळणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत

. प्रत्येक बदली झालेल्या कर्मचाऱ्याची दिव्यांग, अंतर किंवा इतर संबंधित प्रमाणपत्रे अहवालासोबत जोडणे, पडताळणी समितीतील सदस्यांची स्पष्ट मते नमूद करणे आणि 'संपूर्ण जबाबदारी माझी' अशी स्वाक्षरी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तक्रारदाराने मांडलेल्या प्रत्येक बारकाव्याचा विचार करूनच अहवाल सादर करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या गांभीर्यामुळे तालुकास्तरावर अनुभवी अधिकारी व कर्मचाऱ्यांची त्रिस्तरीय स्वतंत्र चौकशी समिती नेमावी,, केंद्रनिहाय पडताळणीसाठी निश्चित तारखा जाहीर कराव्यात, अशी ठोस मागणी पुढे आली आहे. आता ही चौकशी कुठपर्यंत जाते आणि दोषींवर नेमकी काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# एका पोलिस अधिकाऱ्याने काढली तरुणीची छेड!

प्रतिनिधी ३ जानेवारी

◆ गुन्हा दाखल; बाळापूर पोलिसांनी केली अटक

**बाळापूर :** अकोला जिल्ह्यातून असाच काहीसा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अकोला पोलिसांची अब्रू वेशीवर टांगणारी घटना समोर आलीये. चक्क एका पोलिस अधिकाऱ्याने तरुणीची छेड काढल्याचा आरोप करण्यात आलाय. बाळापूर पोलीस स्टेशनला या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. शंकर सुरेश बोंडे असं तरुणीची छेड काढणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे.

पीएसआय बोंडे अकोल्यातील रामदास पेठ पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. आज बाळापुर पोलिसांनी तरुणीची छेड केल्याप्रकरणी अटक केली. तसेच त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मात्र, या घटनेमुळे अकोला पोलीस दलात मोठी खळबळ उडाली. सद्यस्थित अकोला शहरात ही तरुणी भाड्याने राहते. आणि



बाळापुर शहरातल्या नगरपालिकेत डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून कार्यरत आहे. नेहमीप्रमाणे येथे दररोज या ठिकाणी अकोल्याहून बाळापुर येथे राष्ट्रीय महामार्गाने अपडाऊन करतेये. आजही सायंकाळच्या सुमारास नगरपालिका कार्यलयातील काम आटोपून बाळापूरहून अकोल्याकडे निघाली असता, वाटेतचं एक पोलीस अधिकारी तिच्या मार्गावर लागला. काही किमी अंतरावर तिचा पाठलाग करून थोडं दूर गाडी आडवी लावली, आणि तरुणीला म्हणाला की तुझ्या तोंडाचं सोड मला २ मिनिटे बोलायचे आहे, आणि घाणेरडे तसेचं अश्लील इशारे करू लागला. त्यानंतर तरुणीने अकोला पोलिसांच्या डायल ११२ वर कॉल केला. तिथे जुने शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी दाखल झाले. फिर्यादी तरुणीला पोलीस मदत मिळाली आणि बाळापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आलं. पुढ तरुणीच्या तक्रारीनंतर कलम ७८,७९,१२६(२) ॅ ऱ्ए नुसार गुन्हा दाखल करून छेड करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. शंकर सुरेश बोंडे असं या पीएसआयचं नाव असून तो मूळ पिंपळगाव राजा बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी आहे. दरम्यान, अकोला खामगाव राष्ट्रीय महार्गावरील शेळद फाटा ते व्याळा रस्त्यावरील जिओ पेट्रोल पंपा समोर असलेल्या पुलावर ही घटना घडली आहे.. या प्रकरणी बाळापुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक माधुरी पाटील तपास करीत आहे.

# प्रचारासाठी बॅनर, पोस्टर आणि फ्लेक्स उपलब्ध


प्रतिनिधी ३ जानेवारी

◆ सर्व साहित्य वाजवी दरात फक्त 'प्रकाश ऑफसेट' मध्ये

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार ३ जानेवारीपासून सुरू झाला. निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी सर्व उमेदवार जीवाचे रान करत आहेत. मतदारांपर्यंत आपले नाव आणि चिन्ह पोहोचवण्यासाठी पोस्टर, बॅनर आणि फ्लेक्स आवश्यक असतात. हीच गरज ओळखून शहराच्या मध्यवर्ती भागात, तहसील कार्यालयासमोर असलेल्या 'प्रकाश ऑफसेट' मध्ये सर्व प्रचार साहित्य अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

काय, तुम्ही निवडणूक लढवत आहात, आणि तुम्हाला





निवडून यायचेच आहे कारण, 'आता नाही तर कधीच नाही!' अशी संधी वारंवार मिळत नसते. तुम्ही तुमच्या प्रभागात प्रचारासाठी दिवस-रात्र मेहनत करत असाल, पण आपले नाव आणि निशाणी प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्यासाठी तुमच्याकडे प्रचाराचे फक्त दहा दिवस उरले आहेत. तुमच्या विजयासाठी संपूर्ण प्रभागात तुमचे पोस्टर्स, बॅनर्स आणि फ्लेक्स लागणे अत्यंत आवश्यक आहे, कारण आजचे युग हे जाहिरातीचे युग आहे! प्रभागातील सर्व मतदारांना आकर्षित करणारे आकर्षक पोस्टर्स, बॅनर्स आणि फ्लेक्स वाजवी दरात मिळवण्यासाठी आजच संपर्क करा - प्रकाश ऑफसेट आमच्याकडे पोस्टर्स आणि फ्लेक्स लावण्यासाठी लोखंडी फ्रेम्स देखील उपलब्ध आहेत.

सर्व प्रकारचे उच्च दर्जाचे फ्लेक्स, बॅनर, पोस्टर्स आणि होर्डिंग्जची 'फास्ट प्रिंटिंग सर्व्हिस' तीही अत्यंत रास्त दरात मिळेल. तुमच्या प्रचाराला प्रोफेशनल टच देण्यासाठी आणि तुमचा विजय साकार करण्यासाठी आजच तहसील कार्यालया समोर प्रकाश ऑफसेटला भेट द्या.

# अकोटच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प
## नगराध्यक्षा मायाताई धुळे यांचा पदग्रहण सोहळा

वि. प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोट :** अकोट नगरपरिषदेच्या भाजपाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. मायाताई विवेकराव धुळे यांचा पदग्रहण सोहळा १ जानेवारी रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या वेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पदग्रहणप्रसंगी नगराध्यक्षा मायाताई धुळे यांनी अकोट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश भारसाकळे होते, तर अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमदार वसंत खंडेलवाल, भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जिल्हा सरचिटणीस



माधवराव मानकर, ग्रामीण सरचिटणीस राजेश नागमते, ग्रामीण जिल्हा सरचिटणीस रुपालीताई काकडे, माजी नगराध्यक्ष हरिनारायण माकोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. नगराध्यक्षा मायाताई धुळे यांचा सत्कार खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल तसेच मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी खासदार अनुप धोत्रे यांनी शहरातील मूलभूत सोयी-सुविधा, नवीन रस्ते तसेच बायपास प्रकल्प लवकरच मार्गी लागतील, असे आश्वासन दिले. नगराध्यक्षा सौ. मायाताई धुळे यांनी सेवा, पारदर्शकता, नीतिमत्ता व संविधानाच्या मूल्यांनुसार शहराच्या विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण तसेच डिजिटल सुरक्षिततेसाठी ठोस निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे यांनी केले, तर सूत्रसंचालन माजी नगरसेवक मंगेश लोणकर यांनी केले. मंचावर मुख्याधिकारी शशिकांत बाबर, भाजप तालुकाध्यक्ष गोपाल मोहोड, शहराध्यक्ष हरिष टावरी, राजेश रावणकर, संतोष झुनझुनवाला, शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, प्रहार जनशक्ती पक्षाचे सुशिल पुंडकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष मो. बद्रुजमा, शिवसेना शिंदे गटाचे डॉ. विशाल इंगोले यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांची पंजवानी परिवाराला भेट

भाजप उमेदवारांनी केले स्वागत

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** गृहराज्यमंत्री पंकज भोयर शुक्रवारी अकोला दौऱ्यावर होते. शहरात आयोजित 'व्हीटेक्स' प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी ते आले असता, त्यांनी खदान सिंधी कॅम्प परिसरातील गोपीचंदजी पंजवानी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. पंजवानी परिवाराच्या वतीने त्यांचे अत्यंत उत्साहात आणि जंगी स्वागत करण्यात आले.

या भेटीदरम्यान प्रभाग १६ मधील भाजपच्या तरुण आणि तडफदार उमेदवार मुस्कान पंजवानी यांच्यासह इतर उमेदवारांनी मंत्र्यांची भेट घेतली. नामदार पंकज भोयर यांनी उपस्थित सर्व उमेदवार आणि कार्यकर्त्यांना भाजपचे उपरणे घालून त्यांचा उत्साह वाढवला. 'प्रभाग १६ मधून



भाजपचे संपूर्ण पॅनल निवडून आणण्यासाठी सर्व उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घ्यावी,' असा संदेश देत त्यांनी सर्वांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. पंजवानी परिवाराशी असलेले जुने कौटुंबिक संबंध जपण्यासाठी त्यांनी आपल्या व्यस्त दौऱ्यातून वेळ काढून ही भेट दिली. याप्रसंगी मुस्कान पंजवानी, आशिष पंजवानी, गोपीचंद पंजवानी, नानकराम राजपाल, विनोद मनवाणी, हिरालाल कृपलानी, रमेश जग्यासी, रामचंद्र पंजवानी, विशाल पंजवानी, कमल सचदेव, प्रकाश सैनानी, डॉ. नितीन विरवानी, शोभराज राजपाल, हरीश राजपाल, गिरधर टकरानी, सुभाष मखीजा, जय लोकवाणी, मनीष लोकवाणी तसेच भाजप उमेदवार सिद्धार्थ उपरवट, संजय बडोणे, सुरेंद्र नागदेव आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# धर्मसेवेनंतर आता श्रद्धा झुनझुनवाला जनसेवेच्या रिंगणात





प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ११ (ब) मधून सौ. श्रद्धा जगदीश झुनझुनवाला अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. अकोला शहरात सदैव धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून धर्मसेवा करणाऱ्या सौ. श्रद्धा जगदीश झुनझुनवाला आता धर्मसेवेसोबतच जनसेवेमध्ये आपले योगदान देण्यासाठी अकोला महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ११ (ब) मधून अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उतरल्या आहेत.

धार्मिक क्षेत्रात भागवत कथेसारख्या विविध अनुष्ठानांचे आयोजन करून सर्वांना भक्तीमार्गाशी जोडणाऱ्या सौ. श्रद्धा झुनझुनवाला सामाजिक कार्याची देखील आवड जोपासतात. नवीन वर्षाच्या निमित्ताने प्रभागातील नागरिकांच्या सामाजिक सेवेचा संकल्प करत त्यांनी प्रभाग ११ (ब) मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तीर्थक्षेत्रांवर भागवत कथांचे आयोजन करून त्यांनी मागील वर्षापर्यंत १५० ते २०० वृद्ध महिला व पुरुषांना वृंदावन, जगन्नाथ पुरी, द्वारका, रामेश्वरम आणि अलीकडेच हरिद्वार सारख्या ठिकाणी भागवत कथा श्रवण, गंगास्नान आणि देवदर्शनाचे पुण्यकार्य घडवून आणले आहे. २०२६ मध्ये नैमिषारण्य येथे भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भविष्यातही अशा धार्मिक आयोजनांसोबतच सामाजिक कार्य करत राहण्याचा संकल्प सौ. झुनझुनवाला यांनी केला आहे. अकोला शहरातील प्रभाग ११ च्या नागरिकांनी सौ. श्रद्धा झुनझुनवाला यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करून धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रासोबतच आता त्यांना जनसेवा आणि सामाजिक सेवेची संधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन झुनझुनवाला परिवाराच्या वतीने प्रभाग ११ (ब) मधील नागरिकांना करण्यात येत आहे.

# झापे हॉस्पिटल उद्यापासून रूग्णसेवेत दाखल



प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोट :** डॉ. अजिंक्य ज्ञानेश्वर झापे एमबीबीएस, एफआयएम, एफआयसीएम (इंटर्नल मेडिसिन) (क्रिटीकल केअर) यांचे सर्व सोयी सुविधायुक्त प्रशस्त 'झापे हॉस्पिटल' रविवार ४ जानेवारी पासून रूग्णसेवेत दाखल होत आहे. रूग्णांना २४ तास आरोग्यसेवा या माध्यमातून उपलब्ध राहील.

रूग्णालयात उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, किडनी रोग, थायरॉईड ग्रंथीचे आजार, दमा, निमोनिया क्षयरोग व फुफ्फुसाचे आजार, मेंदूरोग, मेंदूज्वर, अर्धांगवायू, फिट, मिरगी, मलेरिया, टायफाईड, डेंग्यू व





तापाचे आजार, पोटाचे व आतड्याचे विकार, कावीळ, ॲनिमिया, पेशी कमी व इतर आजारावर उपचार केले जातील.

स्पेशल आय.सी.यु., सेंट्रल ऑक्सिजनेशन प्रणाली, ई.सी.जी., मल्टीपॅरा मोनिटर, सक्शन मशीन, सिरींज पंप नेब्युलायझेशन, इन्फ्यूजन सिरींज पंप, ग्लुकोमिटर, ऑक्सिमिटर, जनरल वार्ड, स्पेशल रूम रुग्णांसाठी उपलब्ध राहतील. अंजनगाव रोडवर श्री शिवाजी शाळे जवळ सुसज्ज झापे हॉस्पिटल रूग्णसेवेत दाखल होत आहे. या भागातील रूग्णांना अद्ययावत तसेच आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे समाधान आहे असे डॉ. अजिंक्य झापे यांनी म्हटले आहे.

# दुहेरी हत्याकांडातील दोन आरोपींना अटक

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** पंचशील नगर, चिखलपुरा परिसरातील हत्याकांडाने शहर हादरून गेले होते. अपहरण करून तरुणाचा निघृण खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह काळ्या पन्नीत बांधून विहिरीत फेकल्याचा धक्कादायक प्रकार सिव्हिल लाइन पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे.

याप्रकरणी सिव्हिल लाइन पोलिसांनी आरोपींना हैदराबाद येथून अटक केली आहे. याप्रकरणी फिर्यादी सुरेश तुकाराम वाकोडे (५५) रा. पंचशील नगर, खरप रोड, चिखलपुरा यांनी दिलेल्या तक्रारीवरून १३ मे २०२३ रोजी सायंकाळी गुन्हा नोंदविण्यात आला. सदर घटना १२ मे २०२३ रोजी सायंकाळी ७.४३ ते रात्री ९.५३ वाजेदरम्यान घडल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलिस तपासात या प्रकरणात एकूण १० आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी ८ आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# अकोला आगमनापूर्वी मुख्यमंत्र्यांची लाडक्या बहिणींना भेट

प्रतिनिधी ३ जानेवारी

**अकोला :** मुख्यमंत्री आणि लाडक्या बहिणींचे देवाभाऊ देवेंद्र फडणवीस यांनी अकोला आगमनापूर्वी लाडक्या बहिणी व बचत गटाच्या महिलांना भेट दिली. स्वयंरोजगाराची उपलब्धता, सामाजिक समरसता, महिला सबलीकरणच्या दिशेने पावले उचलली आहेत. रविवारी अकोला क्रिकेट क्लब मैदानावर दुपारी १ वाजता होणा-या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेला उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

राज्य उन्नती अभियानांतर्गत अकोला जिल्ह्याचा उमेद जिल्ह्यात समावेश करून बचत गटाच्या महिलांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा इतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, जयंत मसने, वैशाली शेळके, मायाताई घुले, वैशालीताई पालीवाल, सुलभाताई दुतोंडे , हर्षद साबळे, वैशाली शेळके, एड. रूपाली काकडे, जयश्रीताई फुंडकर सुमनताई गावंडे, गीतांजली ताई शेगोकार, आदींनी अभिनंदन केले आहे.

बचत गटाच्या महिलांना सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राज्य शासनाच्या द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. खासदार अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर सातत्याने प्रयत्नशील होते. या प्रयत्नाला पालकमंत्री आकाश कुंडकर यांची साथ मिळाली. त्यांच्या प्रयत्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्र ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंग चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा केला. त्याची फलश्रुती म्हणजे राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये अकोला जिल्ह्याचा समावेश झाल्यामुळे बचत गटाच्या महिलांना स्वयंरोजगाराची संधी प्राप्त होणार आहे. या संधीचा जवळपास दहा लाख महिलांना लाभ होणार आहे. महिलांना इ-मार्केट फॉर्म बाजारपेठ तसेच वेगवेगळ्या सुविधा या माध्यमातून मिळणार आहे हक्काचे बाजारपेठ उपलब्ध होणार आहे त्यामुळे नागरिकांसोबत मातृशक्तीला सुद्धा याचा लाभ मिळणार आहे. बचत गटाच्या महिलांनी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर यांच्या अभिनंदन व आभार व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमध्ये बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहतील असा विश्वास व्यक्त केला आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135



CMYK CMYK